नियमित फौ. ख.क्र.७५/२०१५ निशाणी क्र.५०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | ललिता नवनाथ चव्हाण |
| वय | - | ३७ वर्षे- |
| कामधंदा | - | शेती |
| राहणार | - | कैलासनगर, ता.नांदगांव, जि.नाशिक. |

१. **सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.चेतन जायलवाळ यांचे मार्फेत-**

आरोपी क्र. १ माझे पती आहेत. दि. २३.०४.२००४ रोजी नांदगाव येथे माझे आरोपी क्र. १ सोबत लग्न झाले. लग्नानंतर मी श्रमिक नगर नाशिक येथे नांदावयास गेले. मला मुलगा होयपर्यंत व्यवस्थित नांदवले. मूलगा जन्मल्यानंतर २ दिवसांनी वारला. त्यानंतर त्यांनी मला मुलगा वारल्याच्या कारणावरुन व त्यानंतर मला मुलबाळ होत नसलेचे कारणावरुन त्रास द्यायला सुरुवात केली. २००९ साली आरोपींनी माझेकडे घर घेणेसाठी ३,००,०००/- रुपये माहेरुन घेऊन ये अशी मागणी केली. जेठ, नणंद, नवरा व सासू यांनी माझेकडे पैशाची मागणी केली. मी माझे आईकडे येऊन आरोपी माझेकडे पैशाची मागणी करतात व मला त्रास देतात याबाबत सांगत होते. त्यावर मला आई समजावून सांगत होती व नांदणेस पाठवून देत होती. त्यानंतर आरोपी मला मूल होत नाही व त्यामुळे नांदवायचे नाही या कारणावरुन मारहाण करीत असत. मला सासू, जेठ, नवरा, नणंद हे हाता चापटीने मारहाण करीत असत. तसेच ते मला मानसिक त्रास देत होते व वाईट शिवीगाळी करीत होते. दि. २०.०५.२०१४ रोजी आरोपींनी मला घराबाहेर काढले. त्यानंतर मी माझे आई वडिलांकडे आले व आईला सर्व प्रकार सांगितला त्यानंतर आईने सदरचा प्रकार माझे मामाला सांगितला.

त्यानंतर मी मालेगाव येथील महिला मंडळामध्ये सर्व आरोपींचे विरुध्द तक्रार नोंदविली. त्या तक्रारीची प्रत आता मला दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे.

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ५१** देण्यात आली. तेथे सर्व आरोपींना बोलाविण्यात आले. त्यानंतर आरोपींनी मला त्यांचेकडे नांदविण्यास घेऊन जाण्यास नकार दिला. त्यानंतर नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये येऊन माझे मामांनी तक्रार दिली. साक्षीदार पुन्हा सांगते की, मामा माझेसोबत होते. मी पोलिसांना मला जो त्रास झाला त्याबद्दल सर्व सांगितले. मी पोलीस स्टेशनला एकटी जाऊ शकत नव्हते म्हणून माझे एक मामा यांना घेऊन मी पोलीस स्टेशनला गेले. तेथे गेल्यानंतर माझे मामा पोलीस स्टेशनच्या बाहेर थांबले होते. मी सांगितलेनुसार पोलिसांनी लिहून घेतले. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ५२ देण्यात आली. आज रोजी न्यायालयामध्ये तीन आरोपी हजर आहेत. बाकी आरोपींना पाहिलेस मी ओळखू शकते.

२. <u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.वाय. आर. शेख यांचे मार्फेत-</u>

अनिल देवसिंग मोहिते हे मामा माझेसोबत पोलीस स्टेशमध्ये आले होते. मी ९ तारखेला पोलीस स्टेशनमध्ये गेले होते परंतु कोणत्या महिन्यात व कोणत्या वर्षी हे मला सांगता येणार नाही. मी किती वाजता पोलीस स्टेशनला गेले होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस स्टेशनमध्ये जेव्हा गेले तेव्हा माझी मानसिक स्थिती घाबरलेली होती व चांगली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे काय बोलावे व काय बोलू नये हे मला सूचत नव्हते. मी पोलीस स्टेशनला गेलेनंतर १५ ते २० मिनिटांनी तेथील साहेब आले. त्यांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनमध्ये साहेब आलेनंतर माझे मामांनी साहेबांना ही माझी भाची आहे हिची फिर्याद नोंदवून घ्या असे सांगितले. मी पोलीस स्टेशनमधील साहेबांना पूर्वीपासून ओळखत नव्हते.

मला घरातून काढलेनंतर मी माझे माहेरी आले त्यावेळी घरामध्ये माझी आई होती. त्याच दिवशी मी घडलेला सर्व प्रकार माझे आईला सांगितला. माझेकडे व माझ्या आईकडे मोबाईल नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की माझे आईकडे मोबाईल आहे. माझी आई अशिक्षित आहे. तिला इंग्रजी तारखा, नंबर समजत नाही. मी आईला ज्या दिवशी घडलेला प्रकार सांगितला त्याच दिवशी आईने सदरचा प्रकार माझे मामांना सांगितला. माझे मामा माणिकपुंज येथे असतात तेथे जाऊन माझे आईने घडलेला प्रकार त्यांना त्याच दिवशी सांगितला. माझे घरापासून माणिकपुंज १० ते १५ किलोमीटर अंतरावर

आहे. माझ्या मामांचे वडील राजकारणात सक्रीय होते व ते गावातील पुढारी होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे मामा देखील राजकारणात सक्रीय आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे मामा ड्रायव्हर असल्याने त्यांचे पोलीस स्टेशन तसेच तहसिल ऑफीस येथे जाणे येणे होत असते.

मी देखील माझ्या आईसोबत माणिकपुंज येथे माझे मामांकडे गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे मामांकडे मोटार सायकल व टेम्पो ही दोन्ही वाहने आहेत. मी व माझी आई जेव्हा माणिकपुंज येथे माझे मामांकडे गेलो होतो तेव्हा दुपारचे ३ ते ३:३० वाजले होते. त्यानंतर मी, माझी आई व माझे मामा आम्ही तिघेही कैलास नगर येथील आमचे घरी आलो. तेव्हा ४ ते ४:३० वाजले होते. माझे मामांना नांदगाव येथील पोलीस स्टेशन, तहसिल ऑफीस, सरकारी दवाखाना कोठे आहे याची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घरापासून सरकारी दवाखाना पायी पाच मिनिटाच्या अंतरावर आहे व पोलीस स्टेशन २० मिनिटांच्या अंतरावर आहे. मी, मामा व आई घरी आलेनंतर आम्ही सर्वात पहिले पोलीस स्टेशनमध्ये गेलो. दि. २०.०५.२०१४ रोजी आम्ही पोलीस स्टेशनमध्ये अंदाजे ७:०० वाजता गेलो होतो. मी पोलिसांना सर्व प्रकार सांगितला व त्याप्रमाणे पोलिसांनी लिहून घेतला. फिर्याद लिहून घेतल्यानंतर पोलीस माझे घरी आले नव्हते. दि. २०.०५.२०१४ रोजी नंतर आजतागायत पोलीस माझे घरी केव्हाही आले नाही.

प्रश्न – दि. २०.०५.२०१४ रोजी पोलिसांनी तुमचे मामा व आई यांचेकडे विचारपूस केली होती का ?

उत्तर - ते दोघेही बाहेर उभे होते.

माझा जबाब लिहून घेतलेनंतर पोलिसांनी मला तुमचेसोबत कोण आले आहे का असे विचारले तेव्हा मी पोलिसांना माझे मामा व आई आले आहेत असे सांगितले. मी असे सांगितल्यानंतर संबंधित पोलिसांनी तुमचे मामा व आईंना आत बोलवा असे मला सांगितले.

( साक्षीदार तिच्या उलटतपासामध्ये विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देणेकरीता खूप वेळे घेते त्याबाबत तिला सांगून देखील साक्षीदाराच्या वर्तनामध्ये काहीही फरक दिसून येत नाही. )

पोलिसांनी माझे मामा व आईला घडलेल्या प्रकाराबाबत विचारपूस केली होती व त्यांच्या म्हणणे प्रमाणे पोलिसांनी लिहून घेतले होते. साक्षीदार स्वतःहून सांगते की, आरोपीने मला फिर्याद देण्याच्या दोन दिवस आधी मारहाण करुन बधीर केले होते व मी खूप मानसिक त्रासात होते त्यामुळे मला काही समजत नव्हते. आरोपीने मला लाथाबुक्क्यांनी पोटात मारले होते तसेच तोंडावर देखील मारले होते व माझे तोंडावर मारहाण केल्याचे वळ उमटले होते. मी जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये होते तेव्हा मारहाणीमुळे माझ्या शरीराला वेदना होत होत्या. साक्षीदार सांगते की त्यामुळे मी सारखी खाली बसत होते व मला काही सुचत नव्हते. मला आरोपींनी पोटात मारले तसेच मला काही सूचत नाही व तोंडात चापटीने मारले असे पोलिसांना मी सांगितले होते. मी पोलिसांकडे दवाखान्यात जाण्यासाठी मेडिकल यादी मागितली नाही व पोलिसांनी देखील तशी मला दिली नाही. दि. २०.०५.२०१४ रोजीनंतर अंदाजे १५ दिवसांनी मी स्वतःहून पुन्हा पोलीस स्टेशनला गेले होते. तेव्हा मला पोलीस भेटले नाही. मी त्यांची वाट बघितली व काही वेळाने घरी निघून आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मी पुन्हा पोलीस स्टेशनमध्ये फिर्यादीचे पुढे काय झाले याबाबत चौकशी करण्यासाठी गेले होते. पोलिसांनी मला माझी तक्रार महिला मंडळ यांचेकडे कार्यवाहीकरीत पाठविली आहे असे सांगितले. त्यानंतर पुन्हा मी कधीही पोलीस स्टेशनमध्ये गेले नाही.

मी पोलिसांनी पाठवलेनुसार महिला मंडळमध्ये गेले. दि. ०७.०७.२०१४ रोजी मी महिला मंडळामध्ये गेले होते. त्या दिवशी माझा जबाब माझे सांगणेप्रमाणे लिहून घेतला.

प्रश्न - तुम्हाला महिला मंडळमध्ये जाणेस इतका उशीर का झाला ?

उत्तर - मला खूप त्रास होता व पुन्हा नांदायला घेऊन जातील अशी अपेक्षा होती म्हणून मी वाट पाहत होती.

असे मी महिला मंडळ येथील संबंधित कर्मचाऱ्यांना सांगितले होते. मी जेव्हा महिला मंडळमध्ये गेले त्यावेळेस माझी माझे पतीसोबत नांदण्याची इच्छा होती.

हे म्हणणे खरे नाही की, मी गर्भवती असताना आजारी पडले होते व मला त्रास होत होता. मला बाळ झाल्यानंतर मासिक पाळीचा त्रास होत असल्याने माझे पतीनी मला नाशिक येथील साई हॉस्पीटल, नवजीवन हॉस्पीटल, लाइफलाईन हॉस्पीटल, शिवदे हॉस्पीटल येथे उपचाराकरीत नेले होते. मी साई हॉस्पीटलला चार दिवस एडमिट होते. इतर हॉस्पीटलला मी एडमिट नव्हते केवळ उपचाराकरीता गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पहिले बाळ मुदतीच्या आत जन्मले होते. हे म्हणणे खरे आहे की, सिझर झाले होते.

महिला मंडळमध्ये सुमारे दोन महिने प्रकरण चालले. हे म्हणणे खरे आहे की, सप्टेंबर २०१४ चे अखेरपर्यंत महिला मंडळमध्ये प्रकरण चालले. प्रकरण संपलेनंतर मी वकील लावले. मी माझे पतीला वकीलांमार्फत नांदायला घेऊन जाणेसाठी नोटीस पाठवली होती. २००९ साली आरोपीनी माझेकडे पैसे मागितलेबाबत मी त्यांचेविरुध्द फिर्याद दिली नाही. २००९ नंतर आरोपीनी पुन्हा पैशाची मागणी केली परंतु ती केव्हा केली त्याची तारीख मला सांगता येणार नाही. २००९ नंतर माझेकडे दहा ते बारा वेळेस पैशाची मागणी केली. ज्या ज्या वेळेस मागणी केली त्या त्या वेळेस मी पोलीस स्टेशनमध्ये त्यांचेविरुध्द तक्रार दिली नाही. ज्या ज्या वेळेस माझेकडे पैशाची मागणी करत होते त्या त्या वेळेस मी माझ्या आईला सांगत होते. आईने देखील कोठेही तक्रार दिली नव्हती. साक्षीदार सांगते की, रुपये ३,००,०००/- दिले होते परंतु कोणत्या तारखेला दिले हे सांगता येणार नाही. माझ्या आईने ३,००,०००/- रुपये आरोपींना दिले ही बाब मी पोलिसांना व महिला मंडळामध्ये सांगितली होती. मला मराठी वाचता येत नाही. मला फिर्याद वाचून दाखवली होती. साक्षीदार पुन्हा सांगते की, मी महिला मंडळ व पोलिसांना जी तक्रार दिली होती ती फक्त मारहाणीची होती त्याच्यात पैशाचा उल्लेख केलेला नव्हता. मी वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसमध्ये देखील रुपये ३,००,०००/- दिलेबाबतचा उल्लेख केलेला नव्हता. मी माझे वकीलांना सांगितले होते की माहेरुन आरोपींना रु. ३,००,०००/- दिलेले आहेत.

मी आरोपींचे विरुध्द याच न्यायालयात खावटीसाठी खटला दाखल केला असून तो प्रलंबित आहे. मी याच न्यायालयात खावटी मिळणेकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे अर्ज क्र. १/२०१५ दाखल केला होता. तो अर्ज निकाली निघाला.

**आरोपीतर्फे वकिलांनी केलेल्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्विकृत
sd/-
(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**

माझे समक्ष
sd/-
(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**

दि. २८.०१.२०२५.